# युवा महोत्सव 2022-2023

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक व क्रीडा विभागाद्वारे दिनांक 10 ते 18 डिसेंबर 2020 या कालावधीत युवा महोत्सवाचे आयोजन केले गेले होते. दिनांक 10/12/2022 रोजी युवा महोत्सवाचे उद्घाटन महविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पाटील यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

दिनांक 12/12/ 2020 रोजी जीन्स डे चे आयोजन केले होते. विद्यार्थिनींनी आवर्जून जीन्स घालून आपला आनंद व्यक्त केला. दिनांक 13/12/22 रोजी एक आगळावेगळा कार्यक्रम घेण्यात आला. सामान्यतः फॅशन शो फॅशनेबल आणि वेस्टन ड्रेस मध्ये केला जातो परंतु महाविद्यालयाने पारंपारिक वेशभूषा ही थीम देऊन फॅशन शो आयोजित केला. यावेळी अधिकांश विद्यार्थिनींनी आपला सहभाग नोंदवला. या फॅशन शो मधूनच कॉलेज क्वीन निवडण्यात आली. परीक्षकांनी विजया निलेश पाटील, द्वितीय वर्ष कला हिची **कॉलेज क्वीन** म्हणून निवड केली. दिनांक 14/12/ 22 रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. दिनांक 15/12/ 22 रोजी साडी डे निश्चित केला गेला होता. **साडी क्वीन** म्हणून जान्हवी विजय थळे, तृतीय वर्ष कला हिची निवड करण्यात आली. याच दिवशी अंताक्षरी स्पर्धेचे आयोजनही केले होते. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक एस वाय बीए ने पटकावला. ग्रुपमध्ये निशिता संजय झेले, विजया निलेश पाटील, मनस्वी चिंतामण जुईकर या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. द्वितीय क्रमांक तृतीय वर्ष कले च्या विद्यार्थिनी जान्हवी विजय थळे, प्रतिक्षा प्रकाश पाटील, विधिती निशिकांत गायकवाड यांनी मिळवला. तृतीय क्रमांक एफ वाय बी ए च्या विद्यार्थिनी मानसी प्रवीण चव्हाण, गौरी संजय चव्हाण अपेक्षा रवींद्र पाटील यांना मिळाला. दिनांक 16/12/ 22 रोजी ब्लॅक अँड व्हाईट दिवस नियोजित केला होता या दिवशी संगीत खुर्ची हा खेळ घेण्यात आला. संगीत खुर्ची मध्ये प्रथम क्रमांक दक्षता संदीप गावंड, द्वितीय क्रमांक प्रतिक्षा प्रकाश पाटील तर तृतीय क्रमांक मानसी प्रवीण चव्हाण यांना प्राप्त झाला.

17/12/22 रोजी नऊवारी दिवस व शेलापागोटेचे आयोजन केले होते. **नऊवारी क्वीन** म्हणून सुहानी किशोर पाटील हिची निवड करण्यात आली. दिनांक 18/12/22 रोजी वर्धापन दिनानिमित्त वरील कार्यक्रमाचे व खेळांचे बक्षीस वितरण करण्यात आले. अशाप्रकारे युवा महोत्सव मोठ्या आनंदात व उत्साहात साजरा झाला.












कोकण एज्युकेशन सोसायटी
Time: 17-12-2022 10:52
Note: सारी दिवस
Powered by NoteCam




महिला महाविद्यालय, पेझारी.
२) ना.ना.पाटील कनिष्ठ महाविद्यालय (शाखा-कला, वाणिज्य, विज्ञान)
३) ना.ना.पाटील व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम (शाखा-ई.एम, बी.एम, बँकींग)
४) प्राथमिक व माध्यमिक इंग्रजी माध्यम शाळा
६) पिरोजबाई बारीया प्राथमिक शाळा
७) शिशुविहार (मराठी माध्यम)
८) लक्ष्मी-शालिनी महिला महाविद्यालय (शाखा-कला, वाणिज्य, विज्ञान)